MBA DEPARTMENT NEWS PUBLUSHED DURING 2014-15

# प्रा. राम मेघे एमबीएच्या विद्यार्थ्यांना अमरावती विद्यापीठातील तीन सन्मान

प्रतिनिधी | अमरावती

राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथील व्यवस्थापन शास्त्राच्या एमबीए पदवी विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेमुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सर्वोच्च पाच स्थानांपैकी तीन स्थाने भूषवण्याचा सन्मान प्राप्त केला आहे.

आजपर्यंतचा या महाविद्यालयाचा चढता आलेख व व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर विभागाचा गुणवत्तेचा अश्वमेध सतत वेगवान राखत हेमा नानवानी हिने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र या पदव्युत्तर विभागात सुवर्णपदक पटकावत प्रथम क्रमांक मिळवला, तर कोमल वागळे व चेतन बंचारे या दोघांनी गुणवत्ता यादीतील पाचवे स्थान कायम केले आहे.

या गौरवाच्या समारंभात संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांदे, उपाध्यक्ष प्रा. विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी यांनी संस्थेच्या इतर सर्व कार्यकारिणी सदस्यांसमवेत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ए. पी. बोडखे यांनी व्यवस्थापन शास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एच. एम. देशमुख यांचे विशेषत्वाने कौतुक केले; तसेच डॉ. नितीन धांडे यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्यात.

Divya Marathi: 28/01/2015

प्रतिदिन अखबार

# पास-पड़ोस

अमरावती, सोमवार, 2 मार्च 2015 16

# हेमा नानवानी को 2 स्वर्ण पदक



अमरावती : कुलगुरु डॉ. खेडकर से पदक स्वीकारती हेमा नानवानी.

**प्रतिनिधि, 2 मार्च**

अमरावती- स्थानीय राम मेघे इंस्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी की छात्रा हेमा ऐशोराम नानवानी ने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ से एमबीए(फाइनेंस) में प्रथम स्थान प्राप्त कर 2 स्वर्ण पदक हासिल किए. हाल ही में हुए 31 वें दीक्षांत समारोह में कुलगुरु डॉ. मोहन खेडकर के हाथों स्व. रावसाहब एम.डी. खापर्डे स्मृति में 1 स्वर्ण पदक तथा स्व. दीपक आर. गुप्ता स्मृति में 1 स्वर्ण पदक प्रदान किया गया. हेमा भविष्य में प्रोफेसर बनना चाहती हैं. वह अपनी सफलता का श्रेय माता-पिता, भाई-करण, बहन-ममता, नाना-गुरुदासमल कृपलानी तथा प्रा. एच.एम. देशमुख व शिक्षकों को देती हैं.

To student NB (HM)

Pratidin: 02/04/2015

# प्रा. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चचे यश

अमरावती (प्रतिनिधी)

स्थानिक प्रा. राम मेघे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे व्यवस्थापन शास्त्राच्या एम. बी. ए. पदवी विद्यार्थ्यांनी आपल्या अपूर्व गुणवत्तेमुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सर्वोच्च पाच स्थानांपैकी तीन स्थाने भूषवित महाविद्यालयाचा सन्मान वाढविला.

आजपर्यंतचा सदर महाविद्यालयाचा चढता आलेख व व्यवस्थापन शास्त्र पदव्युत्तर विभागाचा गुणवत्तेचा अश्वमेध सतत वेगवान राखत कु. हेमा नानवानी हिने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र या पदव्युत्तर विभागात सुवर्ण पदक पटकावित प्रथम क्रमांक मिळविला तर कु. कोमल चागळे व श्री. चेतन बंचारे या दोघांनी गुणवत्ता यादीतील पाचवे स्थान कायम केलेले आहे.

या गौरवाच्या समारंभात संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन आर. धांडे, उपाध्यक्ष प्रा. विनय गोहाड, कोषाध्यक्ष पंकज एस. देशमुख, सचिव युवराजसिंग व्ही. चौधरी यांनी शिक्षण संस्थेच्या इतर सर्व कार्यकारिणी सदस्यांसमवेत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ए. पी. बोडखे यांनी व्यवस्थापन शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. एच. एस. देशमुख यांचे विशेषत्वाने कौतुक केले. तसेच व्यवस्थापन शास्त्र विषयातील इतर अध्यापकांनाही अभिवादन केले. तसेच उपरोक्त सर्व गुणवत्ताप्राप्त व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थ्यांनाही त्यांच्या उल्लेखनीय यशाबाबत गौरविले. तसेच डॉ. नितीन धांडे यांनी या प्रसंगी आपल्या उद्बोधनपर भाषणात सदर विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याकरिता हार्दिक शुभेच्छा देत त्यांनी भविष्यातही आपल्या यशाचा आलेख असाच चढता ठेवून महाविद्यालय व संस्थेचे नाव किर्तीमंत करावे व संस्थेची यशोपताका अशीच शिक्षण क्षेत्रात फडकत ठेवावी व निरनिराळ्या आव्हानांना अतिशय धैर्याने व कौशल्याने समर्थपणे तोंड देण्यास सज्ज असावे असे भाष्य केले.

Hindusthan: 04/02/2015

# प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूटची पालकसभा

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. २३ : बडनेरा स्थित प्रो. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड रिसर्चच्या वाणिज्य व्यवस्थापन विभागातर्फे पालकसभा झाली. सभेला एमबीए विभागप्रमुख प्रा. एच. एम. देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. आशीष देशमुख एमबीए अभ्यासक्रम, नियोजन व गुणवत्ता मूल्यमापन यापद्धतीबद्दल विस्तृत माहिती पालकांना दिली. सोबतच प्रा. मयूर जोशी यांनी कॉलेजतर्फे घेण्यात येणारं ट्रेनिंग आणि प्लेसमेंटअंतर्गत येणाऱ्या विविधांगी प्रयत्न व प्रगती पालकांसमोर मांडली. प्राचार्य प्रा. ए. पी. बोडखे यांनी या प्रसंगी शुभेच्छा व्यक्त करीत पालकांसोबतचा हा संवाद असाच सुसंगत करावा, असे आवाहन केले. सुनीता अग्रवाल यांनी पालकांचे प्रतिनिधित्व केले. या प्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या हिवाळी २०१४ मध्ये गुणवत्तायादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सभेचे संचालन प्रा. निनाद गावंडे यांनी केले. आभार प्रा. रविपा कापडिया यांनी केले. आयोजनासाठी प्रा. सचिन पेढे, प्रा. युवराज वैद्य, प्रा. व्ही. टी. डोंगरे, प्रा. मीनल निस्ताने, प्रा. श्रीकांत देशमुख, प्रा. प्रतीक्षा काळमेघ, प्रा. नेहा छावडा यांनी सहकार्य केले.

Sakaal: 24/03/2015